नगरपरिषद, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.
तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत रस्ता रुंदीकरणामध्ये बाधित होणाऱ्या जागेच्या मोबदल्यात नगरपरिषदेची जागा अदलाबदल (हस्तांतरण) करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमयुएम-२०१६/प्र.क्र.७८५/नवि-१७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ३० मे, २०१८

<u>वाचा</u> :-१) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे पत्र क्र.नपप्रसं-२०१६/तुळजापूर न.प./प्र.क्र.१७५/कक्ष-१०/४७८७, दि.२२.१२.२०१६.
२) मुख्याधिकारी, नगरपरिषद, तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांचे पत्र क्र. नपतु/२०१८/कॅम्प मुंबई, दि. २०.०३.२०१८.
३) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे पत्र क्र.२०१४/नपप्र/कार्या-१/कावी-८२४, दि.२५.०४.२०१८.

<u>प्रस्तावना :</u>

तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत श्री.भवानी महाव्दार ते शुक्रवार पेठ या रस्त्याच्या रुंदीकरण कामामध्ये श्री. गोविंद शंकर ढोले यांची संपूर्ण जागा बाधित झाली होती. श्री. ढोले यांचे कुटुंब १०० टक्के विस्थापित होत असल्यामुळे त्यांना नगरपरिषदेने स्वतःच्या मालकीची पर्यायी जागा अदलाबदल करण्यास विशेष सभा ठराव क्र. २७८, दि. २२.०४.२०१३ अन्वये मंजूरी दिली. दरम्यान श्री. ढोले यांच्या सदर जागेवरील बांधकामाचे मुल्य सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांचेकडून करुन घेण्यात आले असून त्यांना रु. ८,४७,४०४/- इतकी रक्कम नगरपरिषदेमार्फत दि.२७.०९.२०१३ रोजी धनादेशाव्दारे अदा करण्यात आली. श्री.ढोले यांना त्यांच्या सिटी सर्वे क्र.१५९७ मधील क्षेत्र १९३.४० चौ.मी. जमिनीऐवजी नगरपरिषद तुळजापूर मालकीच्या सिटी सर्वे क्र.४४३ मधील एकूण क्षेत्रापैकी १९३.४० चौ.मी. इतक्या जमिनीची अदलाबदल करुन द्यावयाच्या जमिनीचे मुल्यांकन सन २०१८-१९ च्या रेडीरेकनरनुसार एकसमान आहे. सदर प्रकरणी अवमान याचिका क्र. ८९/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्देशानुसार तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत श्री. भवानी महाव्दार ते शुक्रवार पेठ पाण्याची टाकी १२.०० मीटर रस्ता रुंदीकरणामुळे श्री. ढोले यांच्या बाधित होणाऱ्या जमिनीच्या (सि.टी. सर्वे नं. १५९७ मधील क्षेत्र १९३.४० चौ.मी.) मोबदल्यात नगरपरिषदेची जमीन (सि.टी.सर्वे नं.४४३ मधील १९३.४० चौ.मी.) अदलाबदल (हस्तांतरण) करण्यास मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र.५७/२०१३ मध्ये मा.न्यायालयाने दि.३०.१०.२०१४ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने, मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अवमान याचिका क्र. ८९/२०१६ च्या अनुषंगाने, श्री.गोविंद शंकर ढोले यांचे तुळजापूर विकास प्राधिकरणांतर्गत रस्ता रुंदीने बाधित झालेल्या क्षेत्राच्या (सि.टी. सर्वे नं. १५९७ मधील क्षेत्र १९३.४० चौ.मी.) बदल्यात नगरपरिषदेच्या मालकीची पर्यायी जमीन (सि.टी.सर्वे नं.४४३ मधील १९३.४० चौ.मी.) कायमस्वरुपी अदलाबदल (हस्तांतरण) करण्यास, महाराष्ट्र नगरपालिका (स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण) नियम १९८३ मधील भाग-७ संकीर्ण नियम २६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर नियमातील भाग-१ नियम-४ शिथिल करुन, या शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणी मुख्याधिकारी, नगरपरिषद, तुळजापूर यांनी जमीन अदलाबदल (हस्तांतरण) करण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५३०१५१३५०८८२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Kailas Madhukar Badhan

Digitally signed by Kailas Madhukar Badhan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=22804d8f98c03e9a67ca8eca6a02e7eaab4bcc4a3d59dfce4f1c7189ab74b085, serialNumber=e83c1c73de120837488d76379734db4868992e2b35ba1df8cfea9650fcff780f, cn=Kailas Madhukar Badhan
Date: 2018.05.30 15:14:44 +05'30'

(कैलास बधान)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.
४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
५. जिल्हाधिकारी, उस्मानाबाद.
६. मुख्याधिकारी, तुळजापूर नगरपरिषद, तुळजापूर, जि. उस्मानाबाद.
७. प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती (नवि-१७).